# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/२०१९ दिनांक १६ सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास आणि संशोधन प्रशाळेत साहित्य सृजन या भित्तीपत्रकाचे विमोचन विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन प्रशाळेत एम.ए.प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. त्यावेळी साहित्य् सृजन या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. त्या प्रसंगी व्यवस्थान परिषद सदस्य दिलीप पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे होते.

यावेळी दिलीप पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या विविध योजनांचा आढावा घेतला व त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.पगारे यांनी प्रशाळेत आलेला विद्यार्थी हा एक चांगला माणूस म्हणून समाजात गेला पाहिजे. तो बुध्दीवादी व प्रखर ज्ञानी असला पहिजे. असे मत मांडत प्रशाळेव्दारे विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या विविध सुविधांची माहिती दिली. याप्रसंगी प्रशाळेतील इंग्रजी विभागाच्या प्रमुख डॉ.मुक्ता महाजन, डॉ.सुनील कुळकर्णी, डॉ.आशुतोष पाटील व इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:- कबचौउमवि/१६/बातमी-हस्तदेय/२०१९ दि. १६ सप्टेंबर, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी